सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : १४४२(१)(४)/२०२१/तेवीस दिनांक : ०२ डिसेंबर, २०२२

**-: प्रसिद्धीपत्रक :-**

**विषय :- पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा - २०२१**
सर्वसाधारण गुणवत्ता यादी व तात्पुरती निवड यादी
तसेच भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या (Opting Out) सुविधेबाबत.

**संदर्भ :-** जाहिरात क्रमांक ५२/२०२२

राज्य शासनाच्या सेवेतील पोलीस शिपाई, पोलीस नाईक, पोलीस हवालदार आणि सहायक पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांना पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील २५० पदांवरील नियुक्तीसाठी दिनांक ११ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार दिनांक १६ एप्रिल, २०२२ रोजी पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा पूर्व परीक्षा - २०२१ चे आयोजन करण्यात आले होते. प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या दिनांक ०९ जून, २०२२ रोजी जाहीर करण्यात आलेल्या निकालाच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा - २०२१ चे आयोजन दिनांक ३० जुलै, २०२२ रोजी करण्यात आले व मुख्य परीक्षेचा निकाल दिनांक २३ सप्टेंबर, २०२२ रोजी जाहीर करण्यात आला. मुख्य परीक्षेच्या निकालाआधारे एकूण १०३१ उमेदवार शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरले.

**२.** शारीरिक चाचणीसाठी पात्र उमेदवारांची शारीरिक चाचणी दिनांक २८ नोव्हेंबर, २०२२ ते दिनांक ०२ डिसेंबर, २०२२ या कालावधीत डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित पध्दतीने पुणे केंद्रावर घेण्यात आली. शारीरिक चाचणीचा कार्यक्रम संपल्यानंतर त्वरीत प्रस्तुत परीक्षेची २४९ उमेदवारांची तात्पुरती निवड यादी व सर्वसाधारण गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असून त्या आधारे उमेदवारांकडून भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प मागविण्यात येत आहे.

**३.** सदर तात्पुरती निवड यादी व सर्वसाधारण गुणवत्ता यादी या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाच्या असून उमेदवारांच्या अर्जामधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूर्वी पडताळणी अंती काही उमेदवारांच्या दाव्यांमध्ये/ शिफारशीमध्ये बदल होऊ शकतो.

**४.** प्रस्तुत तात्पुरती निवड यादी मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणामध्ये दाखल विविध न्यायिक प्रकरणांमधील न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात येत आहे.

**५.** आयोगामार्फत घेण्यात आलेल्या प्रस्तुत परीक्षेकरीता काही उमेदवार यांचे विरुध्द प्रतिरोधीत करण्याबाबतची कार्यवाही प्रस्तावित असल्यामुळे त्यांचा निकाल राखून ठेवण्यात आला असून त्यांचा सर्वसाधारण गुणवत्ता यादी व तात्पुरती निवड यादी यामध्ये समावेश करण्यात आलेला नाही.

**६.** प्रस्तुत परीक्षेच्या भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प सादर करण्याकरीता आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' या मेनूमध्ये 'Post Preference / Opting Out' वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंक दिनांक ३ डिसेंबर, २०२२ रोजी १२.०० वाजेपासून दिनांक १० डिसेंबर, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत सुरु राहील.

**७. ऑनलाईन पध्दतीखेरीज अन्य कोणत्याही प्रकारे पाठविलेला भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय ग्राहय धरला जाणार नाही. तसेच याबाबत उमेदवारांची कोणतीही बाब / निवेदने / पत्रव्यवहार तद्नंतर विचारात घेतली जाणार नाहीत.**

**८.** भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या (Opting Out) विकल्पाआधारे अंतिम निकाल / शिफारशीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल. तसेच भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प निवडणा-या उमेदवारांचा अंतिम निकाल प्रक्रियेत समावेश करण्यात येणार नाही.

**९.** भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प सादर करण्यास कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण उद्भवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ई-मेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

**उप सचिव (परीक्षोत्तर) (अ.प.)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.**

**ठिकाण** : मुंबई.